25 MAR 2017 पुढारी जनसंपर्क अधिकारी शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# 'उडान'चे आज विद्यापीठात उद्‌घाटन

पुढारी Tomato 94.3FM udaan Dream Foundation, Kolhapur in Association with Rotary Club of Kolhapur City Presents

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

ड्रीम्स फाऊंडेशन आणि रोटरी क्लब ऑफ कोल्हापूर सिटी यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'उडान' या कार्यक्रमाला शनिवार (दि. २५) पासून प्रारंभ होत आहे. शिवाजी विद्यापीठातील लोककला केंद्रात सायंकाळी ५.३० वाजता या कार्यक्रमाचे उद्‌घाटन होत आहे.

या कार्यक्रमासाठी दैनिक 'पुढारी' प्रिंट पार्टनर असून टोमॅटो एफएम ९४.३ रेडिओ पार्टनर आहे. २९ मार्चपर्यंत हा कार्यक्रम चालणार आहे.

खासदार संभाजीराजे यांच्या हस्ते कार्यक्रमाचे उद्‌घाटन होणार असून खासदार धनंजय महाडिक अध्यक्षस्थानी असतील. दैनिक 'पुढारी'चे समूह सरव्यवस्थापक अनिल पाटील, शिवाजी विद्यापीठाचे कुलसचिव विलास नांदवडेकर, डॉ. डी. वाय. पाटील समूहाचे ऋतुराज पाटील, शिवाजी विद्यापीठ विद्यार्थी विकासचे संचालक राजाराम गुरव प्रमुख उपस्थित असतील.

२९ मार्चपर्यंत चालणाऱ्या या कार्यक्रमात विविध क्षेत्रांत उत्तुंग 'उडान' घेतलेल्या १४ नामवंतांची यशोगाथा त्यांच्याच शब्दात ऐकता येणार आहे.

ख्यातनाम मुलाखतकार सुधीर गाडगीळ या मुलाखती घेणार आहेत. या कार्यक्रमाचे नियोजन ॲपल इव्हेंटस् अँड मीडिया या संस्थेने केले आहे. हा कार्यक्रम सर्वांसाठी मोफत आहे, अशी माहिती ड्रीम्स फाऊंडेशनचे अध्यक्ष शाम कोरगावकर यांनी दिली. या कार्यक्रमाचे सहसंयोजक जीएस टी, सयाजी हॉटेल, पार्थ फाऊंडेशन, माई ह्युंदाई, बँक ऑफ इंडिया, ईशान स्टेशनरी मॉल, एम अँड के बिल्डिंग सिस्टम प्रायव्हेट लिमिटेड आहेत. तर शिवाजी विद्यापीठाचे विशेष सहकार्य लाभले आहे.

जनसंपर्क अधिकारी
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

2 5 MAR 2017

महाराष्ट्र टाईम्स

फास्ट न्यूज

# शिवाजी विद्यापीठात शहिदांना अभिवादन

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात शहीद दिनानिमित्त शहिदांच्या पवित्र स्मृतींना अभिवादन करण्यात आले. भारतीय स्वातंत्र्यासाठी प्राणांची आहुती देणारे शहीद भगतसिंग, सुखदेव आणि राजगुरू यांच्या स्मृती जागविण्यासाठी आणि भारतीय स्वातंत्र्य अबाधित राखण्यासाठी युवकांना प्रेरित करण्यासाठी शहीद दिन पाळला जातो. शिवाजी विद्यापीठात गुरूवारी सकाळी कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्या हस्ते शहिदांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी विशेष कार्यअधिकारी डॉ. डी.टी. शिर्के, परीक्षा नियंत्रक महेश काकडे, विद्यार्थी कल्याण संचालक डॉ. आर.व्ही. गुरव, समाजशास्त्र अधिविभाग प्रमुख डॉ. जगन कराडे, डॉ. भारती पाटील, डॉ. भगवान माने, डॉ. ए.एम. गुरव यांच्यासह विद्यार्थी, विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

25 MAR 2017 Times of India

जनसपर्क अधिकारी
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# Varsity gives a push to research activities

Piyush.Bhusari
@timesgroup.com

## KEEPING A TALLY

### SUK BUDGET FOCUS

- Rs 40 lakh for improving hostel and mess facilities
- Research activities with increased funding for students, faculties
- Social activities with provisions for Beti Bachao and Organ Donation awareness initiatives
- Housing loan to varsity employees
- Renovation of existing departments, guesthouse and laboratories
- Digitisation of varsity
- Tablet computers to students under e-learning
- Provision for research colloquium activity
- Best researcher award for faculty members and students



### BUDGET FACTS FOR 2017-18

- Total deposits: Rs 341 crore
- Total Expenditure: Rs 344 crore

**Kolhapur:** The Shivaji University, Kolhapur (SUK) presented its budget for the upcoming academic year of 2017-18 on Friday at the annual Senate meeting.

The budget showed an expenditure of Rs 344 crore compared to the Rs 341 crore worth deposits. Compared to last year's budget, the expenditure dropped by Rs 26 crore. The university had an expenditure of Rs 370 crore compared to Rs 366 crore of deposits last year.

University registrar Vilas Nandavadekar while presenting the budget said that the deficit will be covered through university funds from depreciation cost.

The budget for 2017-18 has a focus on research-based activities through increased funding for research fellows and faculty members. The best researcher award for the faculty member as well as student will be started from 2017-18, for which a provision of Rs 1 lakh has been made in the budget.

There are funding provisions for tablet computers (Tabs) to be given to the students under e-learning and improving the hostel mess and canteen facilities. "The university allotted Rs 25 lakh to improving the mess and canteen in the campus," Nandavadekar said.

He added that a provision of Rs 6.5 crore was made for the teachers studying at university-affiliated colleges to encourage them to get into research. "For postgraduate students in the affiliated colleges, a provision of Rs 5 crore has been made. Overall, a corpus fund of Rs 13 crore was created from which these schemes will be run," Nandavadekar said.

Taking a step forward to improve the present infrastructure for various departments, the budget allotted an amount of Rs 16.63 crore from the university's research and development fund.

In the social sphere, the university has also made provisions of Rs 3 lakh for the 'Beti Bachao' awareness campaign and an organ donation drive.

According to the SUK, for expansion and renovation of the university guest house, a provision of Rs 40 lakh was made in the budget. It also provides for housing loan to its employees for which an amount of Rs 1 crore has been sanctioned.

Devanand Shinde, SUK vice-chancellor, said, "It is a student-centric budget in which colleges as well as university students have been included via various initiatives. The budget will give an impetus to students' employability and placement and will enhance the student skills with its research-oriented approach."

25 MAR 2017 लोकमत
जनसंपर्क अधिकारी
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

**शिवाजी विद्यापीठाचे ३४१ कोटींचे अंदाजपत्रक : राज्यात पहिल्यांदाच ऑनलाईन प्रक्रिया; विद्यार्थ्यांना मिळणार 'टॅब'**

# विद्यार्थी विकासाला बळ; संशोधनाला चालन

कोल्हापूर : संशोधन जागृती व सुविधा साहाय्य अनुदान, गोल्डन ज्युबिली स्कॉलरशिप, उत्कृष्ट संशोधक पुरस्कार अशा विविध नवीन योजना, उपक्रमांचा समावेश असलेले विद्यार्थीकेंद्रित आणि संशोधनाला चालना देणाऱ्या शिवाजी विद्यापीठाच्या ३४१ कोटी ५० लाख ७२ हजार रुपयांच्या अंदाजपत्रकाला अधिसभेने शुक्रवारी मान्यता दिली. यावर्षी विद्यापीठाच्या वित्त व लेखा विभागाने अंदाजपत्रकासाठी पूर्ण प्रक्रिया ऑनलाईन पद्धतीने राबविली. अशा स्वरूपातील हा विद्यापीठ पातळीवरील राज्यातील पहिलाच प्रयत्न ठरला आहे.

विद्यापीठ कार्यालयातील या सभेच्या अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, तर परीक्षा नियंत्रक महेश काकडे, प्रभारी वित्त व लेखाधिकारी अजित चौगुले, विशेष कार्य अधिकारी डॉ. डी. टी. शिर्के उपस्थित होते. कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी हे अंदाज़पत्रक सादर केले. अधिसभेसमोर २०१७-१८ या आर्थिक वर्षासाठी मांडलेल्या या अंदाजपत्रकात ३४१ कोटी ५१ लाख ३२ हजार रुपये अपेक्षित जमा, तर अपेक्षित खर्च ३४४ कोटी २७ लाख ८५ हजार इतका अंदाजित आहे. हे अंदाजपत्रक २ कोटी ७७ लाख रुपये इतक्या तुटीचे आहे. अंदाजपत्रक तुटीचे असले, तरी ते विद्यार्थी विकासाला बळ आणि संशोधनाला चालना देणार असल्याचे कुलगुरु डॉ. शिंदे व कुलसचिव डॉ. नांदवडेकर यांनी अधिसभेत स्पष्ट केले.

या वर्षीच्या अंदाजपत्रकात गेल्या वर्षीच्या तुलनेत अपेक्षित जमा रकमेत ११ कोटी ११ लाख आणि अपेक्षित खर्चात १४ कोटी २८ लाख रुपयांची वाढ झाली आहे. हे अंदाजपत्रक देखभाल, विकास, वेतन, संस्था योजना आणि निलंबन लेखे यांमध्ये विभागले आहे. अंदाजपत्रकात गोल्डन ज्युबिली स्कॉलरशिपअंतर्गत विद्यापीठातील विविध अधिविभागांच्या रौप्यमहोत्सवी वर्षासाठी तेथील संशोधक विद्यार्थ्यांसाठी दोन लाख, सुवर्णमहोत्सवी वर्षासाठी पाच लाख रुपयांची संशोधन शिष्यवृत्तीसाठी आर्थिक तरतूद केली आहे.

महाविद्यालयातील शिक्षकांना संशोधन साहाय्य अनुदान, पदवी पातळीवरील विद्यार्थ्यांना संशोधन जागृती अनुदान, नोंदणीकृत संशोधन विद्यार्थ्यांसाठी सुविधा साहाय्य अनुदान व छत्रपती शिवाजी महाराज पुरस्कार यासाठी एकत्रितपणे १३ कोटींचा कॉर्पस फंड तयार करण्यात आला आहे.

या सभेस अधिष्ठाता डॉ. पी. डी. राऊत, वासंती रासम, पी. पाटील, ए. एम. ग्रंथपाल डॉ. नमिता खोत, आर गुरव, पी. टी. गायक उपकुलसचिव डॉ. व्ही. शिंदे, आदी उपस्थित (प्रतिनिधी)

## नोंदणी ते पूर्तता अहवालापर्यंत ऑनलाईन प्रक्रिया



- या वर्षीचे अंदाजपत्रक तयार करण्यासाठी वित्त विभागामध्ये संगणक प्रणाली विकसित करण्यात आली. याद्वारे खर्चाची नोंदणी ते पूर्तता अहवालापर्यंतची प्रक्रिया ऑनलाईन पद्धतीने राबविण्यात आली असल्याचे प्रभारी वित्त व लेखाधिकारी अजित चौगुले यांनी सांगितले. ते म्हणाले, या प्रणालीत विद्यापीठातील विविध विभागांना एकूण ८० स्वतंत्र ऑनलाईन लॉगीन उपलब्ध करुन दिली.
- याद्वारे पहिल्यांदाच संबंधित विभागांनी ऑनलाईन पद्धतीने अंदाजपत्रक नोंदविले. मसुदा व छाननी समितीने दाखविलेल्या त्रुटी उपस्थितांना ऑनलाईन कळवून त्यांची पूर्तता अहवाल या प्रणालीद्वारे प्राप्त करुन घेतली. ऑनलाईन अंदाजपत्रकाचा विद्यापीठ पातळीवरील हा राज्यातील पहिल्याच प्रयत्न आहे.

| शीर्षक | अपेक्षित जमा | अपेक्षित खर्च |
|---|---|---|
| ◆ देखभाल अंदाजपत्रक | ७६ कोटी ३२ लाख ३ हजार | ९१ कोटी ८९ लाख १८ हजार |
| ◆ विकास अंदाजपत्रक | ३१ कोटी २२ लाख | ३१ कोटी २२ लाख |
| ◆ वेतन अंदाजपत्रक | ७० कोटी ७६ लाख ८० हजार | ७० कोटी ८९ लाख २३ हजार |
| ◆ संस्था योजना (संशोधन) | ५४ कोटी ७५ लाख ६६ हजार | ३२ कोटी १ लाख ६३ हजार |
| ◆ निलंबन लेखे | १०८ कोटी ४४ लाख २३ हजार | ११८ कोटी २५ लाख ८१ हजार |

## पदसिद्ध अधिकाऱ्यांची उपस्थिती

नवीन विद्यापीठ कायदा लागू झाला आहे. मात्र, त्यानुसार नवीन अधिकार मंडळे स्थापन करण्याची प्रक्रिया सुरु आहे. त्यामुळे अंदाजपत्रकाची शुक्रवारची अधिसभा पदसिद्ध सदस्यांच्या उपस्थितीमध्ये झाली. यामध्ये अंदाजपत्रक आणि विद्यापीठाच्या ५३ व्या वार्षिक अहवालास मंजुरी देण्यात आली.



"विद्यार्थीकेंद्रित आणि सर्वांगीण विकासाचे या वर्षीचे अंदाजपत्रक आहे. विद्यापीठाच्या सर्वांगीण विकासाच्या अनुषंगाने विविध योजना, उपक्रमांचा समावेश केला आहे. पेपरलेस कामकाजाच्या दृष्टीने या वर्षीच्या अंदाजपत्रकाची प्रक्रिया ऑनलाईन राबविली आहे. अधिसभेचे इतिवृत्त ऑनलाईन नोंदविले आहे. विद्यापीठाला ज्ञानाच्या मार्गानेच उत्पन्न वाढविता येते. त्यामुळे ज्ञानाच्या सीमा रुंदावण्यात येतील. -डॉ. देवानंद शिंदे , कुलगुरु

## अंदाजपत्रकाची वैशिष्ट्ये

- ई-लर्निंग अंतर्गत विद्यार्थ्यांना टॅब देण्यासाठी प्रायोगिक तत्त्वावर तीन लाखांची तरतूद
- विद्यापीठाच्या वसतिगृहांमधील मेस व उपाहारगृहांच्या सुधारणेसाठी २५ लाखांची तरतूद
- उत्कृष्ट संशोधक पुरस्कारासाठी १ लाख, तर संशोधनविषयक उपक्रमांसाठी ५ लाखांचा निधी
- सर्वोत्कृष्ट अधिविभाग योजनेअंतर्गत विज्ञान, अभियांत्रिकी व अन्य विभागांसाठी २० लाख रुपयांची तरतूद
- विद्यापीठातील कर्मचाऱ्यांसाठी गृहकर्ज योजनेसाठी १ कोटी रुपयांची तरतूद
- तंत्रज्ञान अधिविभाग, स्कूल ऑ[f] सायन्सच्या पायाभूत सुविधांसा[ठी] अनुक्रमे ५० व ४० लाखांची तर[तूद]
- विद्यापीठ परिसरातील जलसंधा[रण] समृद्धी योजनेसाठी ५० लाख.
- साताऱ्यातील शहीद स्मृती केंद्रा[च्या] देखभालीकरिता ५ लाखांची तर[तूद]
- बेटी बचाव आणि अवयवदान अभियानाद्वारे समाजात जागृती करण्यासाठी ३ लाख
- विद्यापीठाच्या अतिथिगृहाचे नूतनीकरण, विस्तारीकरणासाठी [...] लाख, मुद्रणालयात आधुनिक यंत्रसामग्री खरेदीसाठी १ कोटी [...] लाख
- डॉ. बाळकृष्ण यांच्या 'शिवाजी [...]' ग्रंथाच्या छपाईसाठी ८ लाख रुप[यांची] तरतूद